सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग, महाराष्ट्र राज्य

सारथी

शाहू विचारांना देऊया गती, साधूया सर्वांगीण प्रगती

**छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे**

सारथी मुख्यालय, सीटी सर्वे नंबर १७३, बी/१, सेनापती बापट रोड, शिवाजीनगर, पुणे (महाराष्ट्र) - ४११००४

| Email ID : sarthipune@gmail.com | CIN - U74999PN2018NPL177394 | Website : www.sarthi-maharashtragov.in | 020-25592502 |
|---|---|---|---|


# डॉ. पंजाबराव देशमुख-सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती २०२५-२६ करिता पात्र विद्यार्थ्यांकडुन अर्ज मागविणेसाठी जाहिरात

देशातील नामांकित २०० शैक्षणिक संस्थामध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रवेशित “मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी – मराठा” प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून “डॉ. पंजाबराव देशमुख - सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती” योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. शासन निर्णय ईबीसी-२०१७/प्र.क्र. ४०२/शिक्षण -१, दि.०८/११/२०१७ व शासन शुध्दीपत्रक क्र.: ईबीसी-२०१७/प्र.क्र.४०२/शिक्षण -१, दि. १९/०३/२०१८ शासन निर्णयांसोबतच्या परिशिष्ट “ब” मध्ये नमूद शैक्षणिक संस्थामध्ये पूर्णवेळ अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित लक्षित गटातील पात्र विद्यार्थ्यांना “डॉ. पंजाबराव देशमुख - सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती” प्रदान करण्याचा निर्णय सारथी संस्थेने घेतला आहे. ही योजना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून लागू करण्यात आली आहे. त्यानुसार देशातील नामांकित २०० शैक्षणिक संस्थामध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षासाठी पदवी / पदव्युत्तर पदवी / पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमास प्रवेशित “मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी –मराठा” प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून विहित नमुन्यात सर्व आवश्यक कागदपत्रासह अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जाचा नमुना व अधिक सविस्तर माहितीसाठी www.maharashtra.gov.in (ताज्या घडामोडी ) आणि सारथी संस्थेच्या sarthi.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

ऑनलाईन अर्ज भरण्याची तारीख : दि. ०१.०३.२०२६ ते दि. १६.०३.२०२६ सायंकाळी ६:१५ वाजेपर्यंत

**मूळ अर्ज व कागदपत्रे (Hardcopy) सारथी संस्थेस पाठविण्याची अंतिम तारीख : दि. १६.०३.२०२६ सायंकाळी ६:१५ वाजेपर्यंत**

**सूरज मांढरे (भा.प्र.से.)**

**व्यवस्थापकीय संचालक,सारथी, पुणे**